Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 05 February 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: ०५ फेब्रुवारी २०२५ सकाळी ११.०० वाजता.**

****

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी आज मतदान होत आहे. विधानसभेच्या ७० जागांसाठी एकूण ६९९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. मतदान प्रक्रिया सुरळीतपणे पार पडावी यासाठी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

****

पंतप्रधान मोदी आज उत्तर प्रदेशात प्रयागराज इथं महाकुंभमेळ्याला भेट देणार आहेत. यावेळी ते त्रिवेणी संगमावर पवित्र स्नान करणार असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. त्यानंतर पंतप्रधान अनेक साधू संतांची भेट घेऊन महाकुंभमेळ्याची पाहणी करणार आहेत.

****

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या परधोरण समितीची तीन दिवसीय बैठक आजपासून मुंबईत सुरु होत आहे. बँकेचे नवनिर्वाचित गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखाली ही पहिलीच बैठक होत आहे. या बैठकीनंतर परवा शुक्रवारी ते नवीन पतधोरण जाहिर करतील.

****

देशात उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाची मान्यता मिळालेल्या स्टार्टअप्सची संख्या गेल्या वर्ष अखेरीपर्यंत एक लाख ५७ हजाराच्या वर गेल्याचं वाणिज्य आणि उद्योग राज्यमंत्री जितीन प्रसाद यांनी काल लोकसभेत सांगितलं. २०१६ मध्ये स्टार्टअप इंडियाची स्थापना झाल्यापासून त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सरकारने विविध उपक्रम हाती घेतल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

****

देशातल्या क्रीडा संस्थांमधली एकहाती सत्ता संपवून त्यांची कार्यपद्धती अधिक स्वायत्त, स्वतंत्र आणि न्याय्य व्हावी म्हणून कठोर उपाययोजना करावी लागेल असं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे. आशियाई कबड्डी महासंघाच्या अध्यक्षांनी भारतीय हौशी कबड्डी महासंघाच्या प्रशासकांना लिहिलेल्या अपमानकारक पत्राची दखल घेऊन महाधिवक्ता तुषार मेहता यांना सूचना देताना सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती कोटीश्वर सिंग यांनी हे वक्तव्य केलं. इराण इथं होणाऱ्या आंतरराष्ट्रीय कबड्डी स्पर्धांमध्ये भारताच्या संघाला सहभागी होण्यात येणाऱ्या अडचणींच निवारण करण्याच्या सूचनाही न्यायालयानं मेहता यांना दिल्या.

****

गुजरातमध्ये समान नागरी कायदा लागू करण्याच्या दृष्टीनं तिथल्या सरकारने ५ सदस्यांची एक समिती स्थापन केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्ती रंजना देसाई समितीच्या प्रमुख पदी आहेत. ही समिती इस्लामसह विविध धर्मसमुदायांच्या नेत्यांशी सल्लामसलत करेल, असं गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी सांगितलं.

****

'ईज ऑफ डुइंग बिझनेस' धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करुन गुंतवणूकदारांना सुलभ सेवा पुरवण्यासाठी उद्योग विभागाच्या मैत्री कक्षाच्या नूतनीकृत MAITRI 2.0 या पोर्टलचं अनावरण काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आलं. मैत्री पोर्टल उद्योग, गुंतवणूक आणि व्यवसाय सुलभीकरणासाठी सुरू करण्यात आलं आहे.

****

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल सामाजिक न्याय आणि शालेय शिक्षण विभागाचा आढावा घेतला. राज्यातल्या सामाजिक न्याय विभागाचं वसतीगृह, शाळांमधली स्वच्छता, विद्यार्थ्यांना देण्यात येणारं भोजन याविषयीची पडताळणी करण्यासाठी सामाजिक न्याय मंत्री, सचिव आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अचानक भेटी देऊन पाहणी करावी, विशेष सहाय्याच्या सर्व योजनांचा लाभ शंभर टक्के थेट बँक खात्यात जमा होईल याची दक्षता घेण्याचे निर्देश, त्यांनी यावेळी दिले. शालेय शिक्षण विभागाच्या माध्यमातून राज्यात अभिनव उपक्रम, प्रयोगांद्वारे डिजीटल तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण द्यावं, असंही शिंदे यांनी सूचित केलं.

****

गृह विभागाप्रमाणेच राज्य उत्पादन शुल्क विभागाचंही नुकसान भरपाईसाठी कायमस्वरुपी धोरण तयार करण्याचे निर्देश, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. अवैध दारू विरोधी कारवाईत मृत्युमुखी पडलेले नाशिकमधले कर्मचारी कैलास कसबे यांच्या कुटुंबीयांना सरकारनं साडे सात लाख रुपयांची नुकसान भरपाई मंजूर केल्याच्या पार्श्वभूमीवर पवार बोलत होते.

****

राष्ट्रीय महिला आयोगातर्फे आगामी तीन महिन्यात देशभरात तरुणांसाठी विवाहपूर्व समुपदेशन केंद्र मोठ्या प्रमाणावर सुरू करण्यात येणार आहेत, अशी माहिती राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी दिली. आयोगातर्फे काल पुण्यात हम तुम या विवाहपूर्व समुपदेशन विषयक एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचं आयोजन करण्यात आलं होतं. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत रहाटकर बोलत होत्या.

****

लातूर जिल्ह्यात २० फेब्रुवारी पर्यंत पंचसूत्री विशेष पंधरवडा राबवला जाणार आहे. यासाठी संबंधित यंत्रणांनी विशेष कार्यक्रमांचं आयोजन करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिल्या. प्रधानमंत्री आवास योजना, आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जनआरोग्य योजना, जलजीवन मिशन या योजनांमधून सुरू असलेल्या कामांचा पाठपुरावा करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

****

सिंधुदुर्ग जिल्ह्याचे उपनिबंधक माणिक सांगळे आणि कार्यालय अधीक्षक उर्मिला यादव यांना ३३ हजार रुपयांची लाच स्वीकारल्याप्रकरणी अटक करण्यात आली. गृहनिर्माण संस्थेची अभिहस्तांतरण प्रक्रिया राबवण्यासाठी त्यांनी ही लाच मागितली होती.

****